**प्रेसनोट दि. २४/१२/२०२४**

**अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची धडक कारवाई**

**"भाटनगर झोपडपट्टी परिसरामध्ये गांजा विक्रीवर छापा कारवाई, सुमारे ३ किलो२३२ ग्रॅम गांजा जप्त ०१ आरोपी ताब्यात"**

**मा.पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांनी पिंपरी चिंचवड शहरामध्ये अंमली पदार्थांचे अवैध विक्रीवर आळा घालणे करीता व अंमली पदार्थांचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेशीत केले आहे.**

**मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे संदिप डोईफोडे, मा सहा पोलीस आयुक्त, गुन्हे २, बाळासाहेब कोपनर यांचे मार्गदर्शनाखाली** अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखे कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संतोष पाटील यांनी अंमली पदार्थ विरोधी पथकातील सहा पोलीस निरीक्षक सचिन कदम, विक्रम गायकवाड व पोलीस अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कोणत्याही प्रकारचे अंमली पदार्थांचे अवैध विक्रीवर आळा घालणे करीता व अंमली पदार्थांचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेशीत केले.

दि २४/१२/२०२४ सपोनि विक्रम गायकवाड व पथक पिंपरी पोलीस स्टेशन हद्दीतील भाटनगर येथील म्हसोबा मंदीरासमोर पत्राशेड परिसारात पेट्रोलींग करीत असताना **पोलीस अंमलदार पो ना १९१६दिपक दौंडकर व पो शि २१३६ गोविंद डोके** यांना एक इसम भाटनगर येथील म्हसोबा मंदीरासमोर पत्राशेडजवळ आडोशाला एक इसम हातामध्ये पांढरे रंगाचे नायलॉनचे पोते घेवुन संशयीतरीत्या थांबलेला दिसला. **इसम नामे सनि धर्मासिंग माचरेकर वय १९ वर्षे रा बिल्डींग नं ५ भाटनगर पिंपरी पुणे. मुळ रा मु. पो श्रमिकनगर, दिक्षीरोड ओझर मिग ता. निफाड जि. नाशिक** याचे ताब्यातुन **एकुण १,७२,५९०/-/- किंमतीचा ३२३२ ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ व ०१ मोबाईल व रोख रक्कम ९९०/- रुपये** जप्त करुन त्याचे याचे ताब्यात मिळुन आलेला गांजा हा अंमली पदार्थ त्यास **महिला नामे गिता मोहन मलके व सुमित सुरेश भाट दोन्ही रा. भाटनगर, पिंपरी, पुणे** यांनी विक्री करीता आणुन दिलेला असल्याचे सांगितले **असुन त्याचे** विरुध्द **पिंपरी पोलीस स्टेशन येथे ११४९/२०२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(ब),२९** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड आयुक्तालय, मा. शशिकांत महावरकर, सह पोलीस आयुक्त, मा. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा.संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, मा. विशाल हिरे, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे १, मा. बाळासाहेब कोपनर, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे २ यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील, सहा पोलीस निरीक्षक सचिन कदम, विक्रम गायकवाड ,सपोफौ प्रदीप शेलार, सपोफौ शकुर तांबोळी, पोहवा/१५०७ किशोर परदेशी, पोहवा/१५०८ मयुर वाडकर, मपोहवा/१४०८ शिल्पा कांबळे, पोना/१७०६ निखिल शेटे, पोशि/२१३६ गोविंद डोके यांचे पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त,
गुन्हे, पिंपरी चिंचवड